



दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४०९ मंगळवार दि ०७ जुलै २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# सापत्न वागणूक देणे अस्वीकारार्ह; निवृत्त कर्मचाऱ्यांबाबत उच्च न्यायालयाने बेस्टला खडसावले

**मुंबई**

प्रदीर्घ काळ प्रामाणिकपणे सेवा बजावल्यानंतर निवृत्तीपश्चात आपल्या कायदेशीर हक्कापासून निवृत्तांनी वंचित राहणे दुर्दैवी आहे. संस्थेच्या इतर विविध मोठ्या आर्थिक खर्चाच्या कामकाजांना नियमित प्राधान्य दिले जात असताना, स्वतःच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवृत्तीविषयक आर्थिक हक्कांच्या अशी सापत्न वागणूक कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह ठरू शकत नाहीफ अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने ङ्बेस्टफ प्रशासनाच्या भूमिकेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. थकबाकीची रक्कम त्वरित देण्याचा आदेश त्याचबरोबर निवृत्त कर्मचारी असलेल्या ६१ याचिकाकर्त्यांना त्यांची पेन्शन, ग्रॅच्युईटी व निवृत्तीपश्चात लाभांची थकबाकीची रक्कम त्वरित देण्याचा आदेश बेस्ट उपक्रमाला दिला. निवृत्तीनंतर वैधानिक हक्क असूनही त्यापासून वंचित असल्याबद्दल या निवृत्तांनी ज्येष्ठ वकील गायत्री सिंग, ॲड. आर. डी. भट्ट, ॲड. प्रिया चौबे, ॲड. लुब्धा भोईर, ॲड. क्रांती एल. सी. यांच्यामार्फत रिट याचिकांद्वारे दाद मागितली होती. त्याविषयीच्या सुनावणीअंती गिरीश कुलकर्णी व न्या. आरती साठे यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. देशातील सर्वाधिक यशस्वी व प्रतिष्ठित सार्वजनिक संस्थांपैकी एक असताना बेस्ट उपक्रमाने आपल्या कर्मचाऱ्यांप्रति असलेली वैधानिक जबाबदारी पार पाडण्यात अशी उदासीनता दाखवणे खेदजनक असल्याचे खंडपीठाने नमूद केले. प्रशासनाने निवृत्तीपश्चातचे लाभ देणे हे माजी कर्मचाऱ्यांवर कृपा नाही. तो त्यांचा वैधानिक हक्क आहे. तो मिळविण्यासाठी त्यांना न्यायालयाचे दार ठोठवावे लागते, हे दुर्दैवी आहे. त्यांच्याप्रति अशी दुर्लक्षिताची भावना त्यांच्या मूलभूत मानसन्मानावर आणि विशेषतः आयुष्याच्या उत्तरार्धातील उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम करणारी आहे. कोणताही सुसंस्कृत समाज सार्वजनिक सेवेत आयुष्यभर कार्य केलेल्या कर्मचाऱ्यांना अशाप्रकारे दडपलेल्या आणि आर्थिकदृष्ट्या हलाखीच्या अवस्थेत सोडून देण्याची अपेक्षा करू शकत नाहीफ अशा शब्दांत खंडपीठाने ङ्बेस्टफच्या



भूमिकेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, बेस्ट उपक्रमाचे रुतलेले चाक बाहेर काढण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करूनही प्रशासनाच्या कारभाराला गती मिळत नाही. याचा प्रवाशांसोबत, कर्मचाऱ्यांनाही फटका बसत आहे. या आर्थिक कोंडीतून ङ्बेस्टफला बाहेर काढण्यासाठी उपक्रमाचे मुंबई महापालिकेतच विलीनीकरण करण्याचा विचार आता पुन्हा एकदा जोरकसपणे पुढे आला असून त्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत. महापालिकाही यासाठी सकारात्मक असल्याचे सांगितले जात आहे.

---

# पुण्यात ६ दिवसांत पावसाने बॅकलॉग भरुन काढला, आणखी दोन दिवस जोरदार बरसणार

**पुणे**

शहर आणि जिल्ह्यात रविवारी जोरदार हजेरी लावलेला पाऊस सोमवारीही दिवसभर बरसला. शहरात रात्री साडेआठपर्यंत ५३ मिलिमीटर, तर चिंचवडमध्ये १३२ मिमी पावसाची नोंद झाली. रात्री उशिरापर्यंतही पाऊस सुरूच होता. रविवारी आणि सोमवारी झालेल्या पावसाने केवळ जुलै महिन्यातील सरासरीच ओलांडली नाही, तर जूनची राहिलेली तूटही भरून काढली. बंगालच्या उपसागरात तयार झालेली द्रोणीय स्थिती आणि पश्चिम किनारपट्टीवर महाराष्ट्रापासून केरळपर्यंत किनारपट्टीला समांतर कमी दाबाचा पट्टा सध्या सक्रिय आहे. त्यामुळे मध्य महाराष्ट्र, सह्याद्री आणि कोकण पट्ट्यात सध्या पाऊस पडतो आहे. पुढील दोन दिवस पोषक वातावरण राहणार असल्याने पाऊसही सुरू राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे. पुणेकरांनी रविवारी सुट्टीच्या दिवशी दिवसभर संततधार आणि संध्याकाळी मुसळधार पाऊस अनुभवला. रात्रीनंतर पावसाचा जोर वाढत गेला आणि सोमवारी सकाळी १० वाजेपर्यंत मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरूच होता. दुपारी एकच्या सुमारास संपूर्ण शहरात मोठी सर पडली. दिवसभर अधूनमधून हलक्या सरी पडतच राहिल्या. त्यामुळे मध्यवर्ती पुण्यासह उपनगरांमधील वाहतूक संथ झाली होती. रस्त्यावर ठिकठिकाणी साठलेले पाणी, खड्ड्यांमधून वाट काढताना नागरिकांची गैरसोय झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी शाळांना सुट्या दिल्या होत्या, त्यामुळे मुलांना पालकांनी घराबाहेर पाठवलेच नाही. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर महापौरांनी शहरातील विविध भागांत पाहणी केली. नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांनी व्यवस्थापन कक्षाला भेट देऊन आढावा घेतला. शहरात रविवारी सायंकाळनंतर झालेल्या मुसळधार पावसासह सोसाट्याच्या वाऱ्याने शहराच्या विविध भागांत अनेक झाडे आणि फांद्या कोसळल्या. अनेक ठिकाणी रस्ते काही काळ बंद ठेवावे लागले, तर झाडे हटविण्यासाठी अग्निशमन दल आणि महापालिकेच्या पथकांना धावपळ करावी लागली.



महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीनुसार, रविवारी सायंकाळी पाच ते सोमवारी सायंकाळी पाच या २४ तासांत शहरात झाडपडीच्या ८३ घटना नोंदविण्यात आल्या. येरवडा, हडपसर, शिवाजीनगर, लोहगाव, पाषाण, कोथरूड, सेनापती बापट रस्ता, मार्केट यार्ड, सदाशिव पेठ, कसबा पेठ, विमाननगर, ताडीवाला रस्ता, कर्वेनगर, नारायण पेठ, वारजे-माळवाडी, एरंडवणे, नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्ता, जंगली महाराज रस्ता, बाणेर, बिबवेवाडी, बावधन, आंबेगाव, औंध, डेक्कन, वडगाव शेरी आणि कात्रज परिसरात झाडे किंवा मोठ्या फांद्या पडल्या.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# डाळींबाबत देश होणार स्वावलंबी



प्रथिनांचा मुख्य स्रोत असलेल्या डाळींबाबत स्वयंपूर्णता ही काळाची गरज आहे. आजच्या घडीस अन्य देशातून डाळींची आयात करावी लागते, मात्र भविष्यात भारत हा डाळीचा जगातील एक प्रमुख निर्यातदार देश व्हावा या उद्देशाने केंद्र सरकार पुरस्कृत डाळींच्या स्वावलंबनाची योजना सुरू करण्यात आली आहे. ११,४४० कोटी रुपयांची तरतूद असलेल्या या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट २०३०-३१ पर्यंत अतिरिक्त ३५ लाख हेक्टरने कडधान्य लागवडीचा विस्तार करून एकूण लागवड क्षेत्र वाढविणे हे आहे. प्रथिनांनी समृद्ध असलेल्या डाळी प्राचीन काळापासून मानवाची प्रथिनांची गरज पूर्ण करीत आहेत. मानवी आहारात डाळींचा समावेश सुमारे ११,००० वर्षांपासून आहे. भारतीय उपखंडात तूर, मूग, उडीद यासारख्या डाळी मूळच्या मानल्या जातात. ऋग्वेद आणि यजुर्वेदातही खल्व (चणा / डाळ) चा उल्लेख आढळतो. त्यामुळेच मानवी आहारातील अतिशय महत्त्वाचा घटक असलेल्या या क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने हे अभियान सुरू करण्यात आले आहे. राज्य सरकारनेही या योजनेसाठी पुढाकार घेतला आहे. या अंतर्गत कडधान्य उत्पादनात देशाला आत्मनिर्भर बनवण्याचे उद्दिष्ट ठेवून हे अभियान राबवले जात असून, याद्वारे शेतकऱ्यांना बियाणे व आर्थिक मदत दिली जाते. कडधान्यांची आयात कमी करून देशांतर्गत उत्पादनात वाढ करणे, हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या अंतर्गत बियाणे खरेदी आणि उत्पादनासाठी १०० टक्के मदत केंद्र सरकारतर्फे केली जाते. उर्वरित उपाययोजनांसाठी राज्य सरकारतर्फे ६० टक्के निधी पुरविण्यात येतो. यात प्रामुख्याने तूर, हरभरा, उडीद आणि मसूर या पिकांवर अधिक भर देण्यात आहे. अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती आणि महिला शेतकऱ्यांना या योजनेसाठी विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दर्जेदार बियाण्यांचे वाटप होईल तसेच शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढेल. त्याचप्रमाणे तूर, उडीद आणि मसूरसाठी चार वर्षांची १०० टक्के हमीभावाने खरेदी सुनिश्चित करण्यात आली आहे. राज्यात बियाणे तसेच कापणीनंतरच्या सुविधांसाठी तरतूद करण्यात आली आहे. हवामानाअनुकुल बियाणे उत्पादन तसेच उपब्धता वाढविणे, कडधान्याच्या लागवड क्षेत्रात वाढ करणे, साठवणूक क्षमतेत वाढ, असे उद्देश यामागे आहेत. ङ्गपीएम आशाफ अंतर्गत मूल्य समर्थन योजनेच्या (पीएसएस) निकषानुसार पुढील चार वर्षांसाठी राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन संघ तसेच राष्ट्रीय सहकारी उपभोक्ता संघाद्वारे तूर, उडीद आणि मूग यांच्या सुनिश्चित खरेदीची हमी घेण्यात आली आहे. शेतजमिनीच्या आरोग्यावरही या अभियानात विशेष भर देण्यात आला आहे. २०३०-३१ च्या अखेरपर्यंत डाळींचे उत्पादन ३५० लाख टन करण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. कारण ते झाले तरच देश डाळींच्या बाबतीत स्वावलंबी होणार आहे. त्यामुळे त्या दिशेनेच कार्यवाही केली जात आहे. राज्यात हे अभियान यशस्वी होण्याच्यादृष्टीने कृषी विभाग सज्ज झाला असून, भविष्यात डाळींच्या स्वयंपूर्णतेत महाराष्ट्राचेही मोठे योगदान असणार आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राज्यभर पावसाचे धुमशान! मुंबई-ठाण्यासह कोकणात जलमय स्थिती; घरांमध्ये पाणी, नागरिकांचे हाल

**■ मुंबई/वृत्तसंस्था**

राज्यात गेल्या 24 तासांपासून पावसाचे जोरदार धुमशान सुरू आहे. मुंबईसह संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांना तलावाचे स्वरूप आले असून जनजीवनही विस्कळीत झाल्याचे दिसून आले. पुढील दोन दिवस, म्हणजे 6 जुलै पर्यंत राज्यात बहुतांश ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे गरज असेल तरच नागरिकांना घराबाहेर पडावे, अशा सूचना हवामान खात्याने दिल्या आहेत.

सतत कोसळणाऱ्या पावसाच्या सरींमुळे मुंबईतील अनेक सखल भागात पाणी साचलेले पाहायला मिळत आहे. शहरात कुठे रस्ते खचले, तर कुठे झाडे कोसळण्याच्या गंभीर घटना समोर आल्या आहेत. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. तर दुसरीकडे कोल्हापुरातही पंचगंगेच्या पातळीत मोठी वाढ झाल्याने चिंता वाढली आहे.



मुंबई, ठाणे, कल्याण, रायगड आणि पालघर या भागांमध्ये पावसाचा जोर कायम असून, कल्याणजवळील आडीवली-ढोकळी परिसर सर्वाधिक प्रभावित झाला आहे. सततच्या पावसामुळे संपूर्ण परिसर जलमय झाला असून, रस्ते, सोसायट्या आणि घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सलग कोसळणाऱ्या पावसामुळे परिसरातील अनेक सोसायट्या, चाळी आणि अंतर्गत रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले आहे. तळमजल्यावरील घरांमध्ये पाणी घुसल्याने फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि इतर घरगुती साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक कुटुंबांना रातोरात आपले सामान सुरक्षित ठिकाणी हलवावे लागले.

मुंबईसह राज्यभरात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. पावसाचा हा जोर अपेक्षेपेक्षा जास्त असून, येत्या 6 तारखेपर्यंत हे संकट कायम राहणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच, नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून अनावश्यक प्रवास टाळावा, गरज असेल तरच बाहेर पडा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. मुंबईतील भांडूपमध्ये शनिवारी मुसळधार पावसाचा कहर दिसून आला. भांडूच्या एलबीएस मार्गावर सुरू असलेल्या एका इमारतीच्या खोदकामादरम्यान मोठ्या प्रमाणात रस्ता खचला. परिणामी एलबीएस मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. याठिकाणी काही लोखंडी केबिन आणि तीन ते चार झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. देशातील जवळपास सर्वच राज्यांमध्ये मान्सूनचे आगमन झाले आहे. राजस्थान आणि गुजरातच्या काही भागांत मान्सूनचे आगमन होणे अजून बाकी असले, तरी गुजरातमध्ये मुसळधार पावसामुळे आधीच पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

## भारत मोठ्या ऊर्जा संकटातून बाहेर पडला : पंतप्रधान मोदी

### 'घरगुती सिलिंडरचा पुरवठा कमी होऊ दिला नाही'

**■ बालोतरा/वृत्तसंस्था**

पश्चिम आशियामध्ये झालेल्या युद्धामुळे 21 व्या शतकातील सर्वात मोठे ऊर्जा संकट निर्माण झाले होते. या काळात भारताच्या दृढ शक्तीमुळे सर्वात मोठे संकटही लहान झाले. भारताने या काळात आपल्या संसाधनांचा योग्य वापर केला. आज भारत मोठ्या ऊर्जा संकटातून बाहेर पडला, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी राजस्थानच्या दौऱ्यावर होते. दुपारी सुमारे 12 वाजता ते बालोतरा येथील पचपदरा येथे पोहोचले. येथे त्यांनी देशातील सर्वात आधुनिक रिफायनरीच्या कंट्रोल रूमला भेट दिली आणि तज्ज्ञांशी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी रिफायनरीचे उद्घाटन केले. जयपूर मेट्रोच्या फेज-2 ची (आभासी) पायाभरणीही केली. पंतप्रधानांनी सांगितले की, युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे घरगुती गॅस सिलिंडरचे दर दोन हजार रुपयांपर्यंत जाऊ शकले असते. सरकारने यावर उत्तम व्यवस्थापन केले. याचाच परिणाम आहे की, सिलेंडर सुमारे 950 रुपयांना मिळत आहे.



पंतप्रधान मोदी म्हणाले की, उन्हाळ्याच्या या हंगामात इतक्या मोठ्या संख्येने लोकांची गर्दी हे दर्शवते की भाजप सरकारच्या प्रयत्नांवर तुमचा विश्वास किती दृढ आहे. या समर्थनासाठी मी राजस्थानच्या भूमीचा ऋणी आहे. आज राजस्थानच्या या भूमीतून भारताने विकसित होण्याच्या, आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने खूप मोठे पाऊल उचलले आहे. आजचा दिवस साक्षी आहे की भाजप सरकारे प्रकल्पांची केवळ पायाभरणी करून सोडून देत नाहीत. आम्ही ते पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र एक करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी सकाळी सुमारे 10:40 वाजता ते जोधपूरला पोहोचले होते. येथे त्यांनी विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचे उद्घाटन केले. नवीन टर्मिनल पाहिले. 'उडान-2.0' ची सुरुवातही केली. याचे सादरीकरण पंतप्रधानांना दाखवण्यात आले.

## आयतुल्लाह अली खामेनेईला श्रद्धांजली वाहताना रडले मंत्रिमंडळ

**■ तेहरान/वृत्तसंस्था**

इराणचे सर्वोच्च नेते आयतुल्लाह अली खामेनेई यांच्यावर अखेर अंतिम संस्कार करण्यात आले. सर्व मंत्रिमंडळ आयतुल्लाह अली खामेनेई यांच्याकरिता रडताना दिसले. त्यांच्या डोळ्यातील अश्रू काही थांबण्याचे नाव घेत नव्हते. हुंदके देऊन रडताना परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आणि इराणी संसदेचे प्रमुख मोहम्मद बागेर गलिबाफ दिसले. आयतुल्लाह अली खामेनेई यांच्या अखेरच्या निरोपाचा कार्यक्रम 3 ते 9 जूनपर्यंत चालणार आहे.

अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात आयतुल्लाह अली खामेनेई ठार झाले होते. त्यांच्या कुटुंबातील जवळपास सदस्यही या हल्ल्यात ठार झाले. इराणचे सध्याचे सर्वोच्च नेते आणि आयतुल्लाह खामेनेई यांचा मुलगा मोजतबा खामेनेई या हल्ल्यात जिवंत राहिले. मोजतबा खामेनेई देखील जखमी आहेत. अख्ख्ये कुटुंब हल्ल्यात मारल्या गेल्यानंतरही मोजतबा खामेनेई यांनी इराणची सूत्रे आपल्या हातात



घेतली. हल्ल्यात गंभीर जखमी झाल्यानंतरही ते देशासाठी लढताना दिसले. इराण आणि अमेरिका युद्ध तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ सुरू होते. मात्र, शेवटपर्यंत इराणने या युद्धात अजिबात हार मानली नाही. अमेरिकेसोबतचे युद्ध थांबल्यानंतर आयतुल्लाह अली खामेनेई यांच्यावर अंतिम संस्कार झाले. यावेळी इराणमधील सर्वप्रमुख नेते उपस्थित होते.

आयतुल्लाह अली खामेनेई यांना अखेरचा निरोप देण्यासाठी भारताच्या प्रतिनिधिमंडळातून बिहारचे राज्यपाल सय्यद अता हसनैन आणि विदेश राज्य मंत्री मार्के रिटा पोहोचले आहेत. इराण सरकारने भारतातील पाच लोकांना याकरिता विशेष आमंत्रण दिले होते.

## संरक्षण दलांना ५२ हजार कोटींचे बळ; अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्र खरेदीला मंजुरी

**■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण खरेदी परिषदेच्या बैठकीत सुमारे ५२ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण खरेदी योजनांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत लष्कर, नौदल आणि हवाई दलाला अत्याधुनिक शस्त्रे, क्षेपणास्त्रे, अँटी-ड्रोन प्रणाली, हवाई संरक्षण प्रणाली आणि पाळत ठेवणारी उपकरणे उपलब्ध करून दिली जातील. यामुळे देशाची युद्धसज्जता आणि सुरक्षा क्षमता पूर्वीपेक्षा अधिक बळकट होणार आहे.

लष्करासाठी 'आकाश तरंग' ही अँटी-ड्रोन इलेक्ट्रॉनिक प्रणाली, खांद्यावरून डागता येणारी रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र प्रणाली, मध्यम पल्ल्याची हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली, अतिशय कमी पल्ल्याची हवाई संरक्षण प्रणाली, रणगाड्यांसाठी सुरक्षा प्रणाली आणि जेटआधारित



कामिकेज (आत्मघाती) ड्रोन प्रणालीच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली आहे. 'आकाश तरंग' सैन्याच्या तुकड्यांना शत्रूच्या ड्रोन हल्ल्यापासून प्रभावी संरक्षण देईल. खांद्यावरून डागता येणारे अँटी-टँक क्षेपणास्त्र शत्रूचे रणगाडे आणि चिलखती वाहने नष्ट करण्यास मदत करेल. तर, मध्यम पल्ल्याची हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली शत्रूचे हवाई धोके वेळेवर रोखण्यास सक्षम असेल. अतिशय कमी पल्ल्याची हवाई संरक्षण प्रणाली अनेक अडथळ्यांमध्येही प्रभावीपणे काम करेल. रणगाड्यांसाठीची नवीन 'अ‍ॅक्टिव्ह प्रोटेक्शन सिस्टीम' त्यांना शत्रूच्या हल्ल्यापासून वाचविण्यास आणि युद्धभूमीवर टिकून राहण्याची क्षमता वाढविण्यास मदत करेल. जेटआधारित कामिकेज ड्रोन प्रणाली कमी खर्चात अधिक मारक क्षमता प्रदान करेल. सुमारे ५२ हजार कोटी रुपयांच्या या संरक्षण खरेदी योजनांचा मुख्य उद्देश तिन्ही दलांना आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वदेशी संरक्षण प्रणालींनी सुसज्ज करणे हा आहे. या अत्याधुनिक प्रणालींच्या समावेशामुळे भारताची राष्ट्रीय सुरक्षा, सीमेचे रक्षण आणि कोणत्याही आव्हानाचे खंबीरपणे सामना करण्याची क्षमता पूर्वीपेक्षा अधिक मजबूत होईल, असा सरकारला विश्वास आहे.

# पतीला खीरमधून दिल्या झोपेच्या गोळ्या, त्यानंतर केली हत्या; 45 दिवसांनी दफन केलेले रहस्य उलगडले

**आग्रा/वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील आग्रा येथे पतीच्या हत्येचा भयंकर प्रकार उघडकीस आला आहे. ४५ दिवसापर्यंत ज्या घरातील व्यक्ती गायब असल्याचं बोललं जात होते. त्याच घरातील बाथरूमच्या फरशीखाली त्याचा मृतदेह दफन केलेला आढळला. ४४ वर्षीय सुरेंद्र कुमार १८ मे पासून बेपत्ता होते. कुटुंब, नातेवाईक आणि पोलीस त्याचा शोध घेत होते. २६ मे रोजी सुरेंद्र कुमार यांच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल केली. या काळात पत्नी रूबी सतत सुरेंद्र कुमारने घर सोडले आणि लवकरच तो परत येईल असं सगळ्यांना सांगत होती.

या प्रकरणात दीड महिन्यानंतर कहाणी पूर्ण बदलली. पोलिसांना जेव्हा घरातील बाथरूममध्ये तोडफोड केली तेव्हा फरशीखाली दफन केलेला सुरेंद्र कुमारचा मृतदेह हाती लागला. त्यानंतर पोलिसांनी आरोपी पत्नी रूबीला ताब्यात घेतले. चौकशीत तिने पतीची हत्या करून मृतदेह बाथरूममध्ये दफन केल्याचे कबूल केले. या प्रकरणात



ज्या मिस्त्रीने घरातील बाथरूम बनवले होते, त्यालाही ताब्यात घेऊन चौकशी केली तेव्हा नवे खुलासे समोर आले. मिस्त्री रवी कुमार म्हणाले की, रूबी हिच्यासोबत माझा परिचय नव्हता. मी त्या परिसरात घराचे बांधकाम करत होतो तेव्हा रूबीने माझ्याशी संपर्क केला. मात्र मला आज यायला जमणार नाही, एक दिवसानंतर काम करू असं सांगितले. दुसऱ्या दिवशी जेव्हा रवी कुमार रूबीच्या घरी पोहचला तेव्हा रूबी स्वतःच बाथरूममध्ये मलबा टाकण्याचं काम करत होती. हे पाहून रवी कुमारने तिला एखादा कामगार लावला असता तर त्याचे भले झाले असते असं म्हटलं. तेव्हा रूबीने मी स्वत: हे काम करेन असं सांगितले. तिने ५०० रूपये देऊन साहित्य मागवले होते असं रवी कुमारने पोलिसांना चौकशीत सांगितले. या बाथरूमचा आकार चार बाय सहाचा होता. तिथे टॉयलेट सीट दीड फूट उंच होती. रुबीसोबत एक मजूर होता त्याने सिमेंट तयार केले. त्यानंतर बाथरूममध्ये नवीन फरशी बसवण्यात आली. मात्र ज्या जागी रूबी फरशी बसवतेय तिथे खाली कुणाचा मृतदेह असेल याची कल्पनाही कुणाला नव्हती असं रवीने म्हटलं. पोलीस चौकशीत रूबीने तिचा गुन्हा कबूल केला. रूबीने पतीला खीर खायला देत त्यातून १५-१६ झोपेच्या गोळ्या मिसळल्या होत्या. त्यानंतर झोपेतच पती सुरेंद्र कुमारची हत्या केली. दुसऱ्या दिवशी दोन मुली आणि सासूला दीराच्या घरी पाठवले. त्यानंतर रूबीने पतीचा मृतदेह खेचत बाथरूमपर्यंत आणला. तिथे मृतदेह खड्डयात पुरला आणि त्यावर माती टाकली. त्यानंतर मिस्त्रीच्या मदतीने तिने बाथरूममध्ये नवीन फरशी बसवली. अनेक दिवस सुरेंद्र गायब होता. त्याचा थांगपत्ता लागत नव्हता. या काळात पत्नी रूबीच्या बोलण्यावर मृतकाचा मोठा भाऊ अनिलला संशय आला. सुरेंद्र गायब झाल्यापासून रूबी वारंवार खोटं बोलत असल्याचे दिसून आले. त्यानंतर अनिलने माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. बँकेचे कागदपत्रे अन् धागेदोरे जोडले. अखेर त्याने रूबीला खडसावून विचारले. जर काही लपवलं असेल तर सत्य सांग असं म्हटल्यानंतर रूबीने धीर सोडला आणि सगळेच सत्य सांगितले. दरम्यान, या घटनेची माहिती पोलिसांना मिळाली तेव्हा पोलीस घटनास्थळी पोहचले. तिथे बाथरूमची फरशी तोडण्यात आली आणि सुरेंद्रचा मृतदेह ताब्यात घेतला. सध्या आरोपी पत्नी रूबी न्यायालयीन कोठडीत आहे. मृतदेहाचे पोस्टमोर्टम करण्यात आले असून फॉरेन्सिक तपासही सुरू आहे. या घटनेत आणखी कुणी सहभागी होते का याचा शोध घेतला जात आहे. पतीच्या हत्येमागे काय कारण होते या प्रश्नाचे उत्तर पोलीस आरोपी रूबीकडून शोधण्याचा प्रयत्न करत आहे.

## अवैध प्लॉटिंगची तक्रार केली म्हणून बिल्डरचा ज्येष्ठ नागरिकाच्या हत्येचा कट

**छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था**

अवैध प्लॉटिंगबाबत सातत्याने तक्रारी करून पाठपुरावा करणाऱ्या ६५ वर्षीय निवृत्त कर्मचाऱ्याला संपविण्यासाठी बिल्डरनेच प्राणघातक हल्ल्याचा कट रचल्याचे उघडकीस आले आहे. यासाठी बिल्डरने स्वतःच्या पेट्रोलपंपावरील कर्मचाऱ्यांना सुपारी देऊन हा हल्ला घडवून आणला. हल्ल्यातील मुख्य आरोपी बांधकाम व्यावसायिक सुरेंद्र कोलते, पेट्रोलपंप व्यवस्थापक भगवान सखाराम अदाने आणि हल्लेखोर शुभम कारभारी कापडणे या तिघांना पोलिसांनी गुरुवारी हर्सूलमधील अमरनाथ हौसिंग सोसायटीजवळून अटक केली.

हल्ल्यात जखमी झालेले दत्तात्रय पांडुरंग ठोंबरे (रा. हर्सूल) यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कोलते याने १५ वर्षांपूर्वी हर्सूलमध्ये ले-आउट विकसित केले होते. नियमानुसार २० फुटांचा रस्ता देणे आवश्यक असताना, कोलतेने केवळ १० फुटांचा रस्ता सोडून उर्वरित जागेची विल्हेवाट लावली. या फसवणुकीच्या विरोधात ठोंबरे यांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रारी केल्या. या रागातून कोलते याने प्राणघातक हल्ल्याचा कट रचला. स्वतःच्या पंपावरील व्यवस्थापक अदाने याच्याकडे ठोंबरे यांच्या हत्येची जबाबदारी सोपविली. अदाने याने पैशांची लालूच दाखवून पंपावरील कामगार शुभमला यासाठी तयार केले. ठोंबरे यांच्यावर हल्ल्यासाठी शुभमने रेकी केली. गुरुवारी तक्रारीच्या अनुषंगाने ठोंबरे सिडको सहायक पोलिस आयुक्तांच्या कार्यालयात गेले होते. तेथून सायंकाळी ७ वाजता घराकडे येत असताना शुभमने साथीदारासह त्यांचा पाठलाग करून ठोंबरे यांच्या पाठीत चाकूने वार करून धूम ठोकली. घटना कळताच ठोंबरे यांच्या मुलाने धाव घेत वडिलांना रुग्णालयात दाखल केले. शुक्रवारी पोलिस उपायुक्त रत्नाकर नवले, सहायक आयुक्त मनोज पगारे, निरीक्षक स्वाती केदार यांनी संशयितांची कसून चौकशी केली. हल्ल्यादरम्यान झटापटीत शुभमच्या तोंडावरील मास्क सरकला. ही सर्व घटना एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली.

## पिसोळीतील फार्महाऊसवर छापा; बेकायदा हुक्का अड्डा उद्ध्वस्त, ७५.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे/वृत्तसंस्था**

कोंढवा परिसरातील पिसोळी येथील एका फार्महाऊसवर छापा टाकून बेकायदा हुक्का विक्री व सेवन सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आणत काळेपडळ पोलिसांनी ७५ लाख ८० हजार ७३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी अनिस सय्यद व त्याचा साथीदार साद सय्यद यांच्यासह संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील अवैध धंदे, तडीपार आरोपी व गुन्हेगारांवर कारवाई करण्याच्या दिलेल्या सूचनांनुसार काळेपडळ पोलिस ठाण्याचे पथक गस्त घालत होते. त्यावेळी पोलिस अंमलदार महादेव शिंदि आणि अतुल पंधरकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, पिसोळी येथील आंबिका हॉटेल रोड, जगदंबा मार्ग परिसरातील एका फार्महाऊसमध्ये अनिस सय्यद व साद सय्यद हे बेकायदा हुक्का विक्री करत आहेत. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी छापा



टाकला असता, तेथे ८ ते १० जण हुक्क्याचे सेवन करताना आढळले. कारवाईदरम्यान पोलिसांनी तीन चारचाकी, दोन दुचाकी, १२ मोबाइल, ८ हुक्का पॉट, तंबाखूजन्य हुक्का फ्लेवर व इतर साहित्य असा एकूण ७५ लाख ८० हजार ७३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी काळेपडळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून सहायक पोलिस निरीक्षक अमित शेटे पुढील तपास करत आहेत. ही कारवाई पोलिस उपायुक्त जीवन बेनिवाल, सहायक पोलिस आयुक्त अतुलकुमार नवगिरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरिषा निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक (गुन्हे) अण्णासो बाबर यांच्या सूचनेनुसार सहायक पोलिस निरीक्षक अमित शेटे, उपनिरीक्षक रघुवीर खोडा तसेच पोलिस अंमलदार प्रवीण काळभोर, दाऊद सय्यद, प्रतीक लाहीगुडे, शाहिद शेख, नीलेश देसाई, अमोल फडतरे, अतुल पंधरकर, विशाल ठोंबरे, लक्ष्मण काळे, नितीन ढोले, सद्दाम तांबोळी, प्रदीप बेडीसकर, महादेव शिंदि, गिरीराज जगदाळे, नंदकुमार जावळे, ज्ञानेश्वर कुलाळ, अक्षय जगताप, शुभम पवार आणि मेघराज जाधव यांच्या पथकाने केली.

## केतनच्या आजोबांचे निधन, नातवाच्या मृत्यूनंतर खचले होते देवीचंद अगरवाल

**पिंपरी/वृत्तसंस्था**

लोहगड किल्ल्यावरील केतनच्या हत्या प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरलेला असताना, आता पीडित अगरवाल कुटुंबावर दुःखाचा आणखी एक डोंगर कोसळला आहे. २५ वर्षीय तरुण व्यावसायिक केतन अगरवाल याच्या निधनाचा तीव्र धक्का सहन न झाल्यामुळे, त्याचे आजोबा देवीचंद अगरवाल (७१) यांचे शनिवारी रात्री ९:४५ वाजता पुण्यात उपचारादरम्यान निधन झाले. एकाच महिन्यात नातू आणि घरातील ज्येष्ठ व्यक्तीच्या निधनाने अगरवाल कुटुंबात शोककळा पसरली आहे. केतनचे वडील विशाल अगरवाल यांनी स्टेटसवर मिस यू डॅड अशी भावूक पोस्ट शेअर करत वडिलांच्या जाण्याची माहिती दिली.

माध्यमांच्या वृत्तानुसार, ७१ वर्षीय देवीचंद अग्रवाल हे गेल्या काही काळापासून आजारी होते. काही दिवसांपूर्वीच त्यांच्यावर हृदयाची एक मोठी आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया पार पडली होती आणि त्यांची प्रकृती हळूहळू सुधारत होती. मात्र, १८ जून रोजी केतनच्या हत्या झाल्याची बातमी समोर आली. या घटनेने आजोबांना प्रचंड मोठा मानसिक धक्का दिला. नातवाच्या अकाली मृत्यूमुळे त्यांची प्रकृती अचानक खालावली. शनिवारी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने खाजगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. मात्र, त्यांचा मृत्यू झाला.





प्रकृती ठीक नसतानाही, देवीचंद अग्रवाल यांनी २७ जून रोजी सोसायटीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कँडल मार्चमध्ये सहभाग घेतला होता. केतनला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आरोपींना कठोर फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली होती. त्यावेळी ते भावूक होऊन म्हणाले होते,"माझ्या म्हातारपणाचा खरा आधार आता हिरावून घेतला गेला आहे. ज्यांच्यावर विश्वास ठेवला, त्यांनीच असा विश्वास घात केला. आम्ही त्या मुलीच्या कुटुंबाला तब्बल ३५ वर्षांपासून ओळखत होतो. तिचे दुसऱ्या कोणावर तरी प्रेम आहे, हे तिच्या घरच्यांना माहिती होते. तरीही तिच्या काका-काकूंनी आमच्यावर लग्नासाठी दबाव आणला आणि मुलगी खूप चांगली आहे असे मला ११० वेळा सांगितले होते."

दुसरीकडे, केतन अग्रवाल प्रकरणातील संशयित आरोपी सिया गोयल आणि तिचा साथीदार चौधरी यांच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्यांना कोर्टात हजर करण्यात आले. सरकारी पक्षाने आरोपींच्या पोलीस कोठडीत आणखी तीन दिवसांची वाढ करण्याची मागणी केली आहे.

# टीम इंडियाचा तिसरा पराभव; दुसऱ्या टी-20 सामन्यात इंग्लंडचा भारतावर 4 विकेट्सनी विजय

**मँचेस्टर/वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेतील दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाला पराभवाचा धक्का बसला. ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानावर झालेल्या लढतीत भारताने इंग्लंडसमोर 191 धावांचे आव्हान उभे केले होते, पण पहिले दोन गडी शून्यावर बाद झाल्यानंतरही इंग्लंडने दमदार फलंदाजी करत 19 व्या षटकातच 4 विकेट्स राखून लक्ष्य गाठले आणि मालिकेत आपले वर्चस्व कायम राखले. विशेष म्हणजे, आयर्लंडविरुद्ध दोन्ही सामने गमावल्यानंतर इंग्लंडविरुद्ध पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. दुसऱ्या सामन्यात मात्र भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. उभय संघातील तिसरा सामना दि. 7 जुलै रोजी होईल.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या टीम इंडियाला 15 वर्षीय पदार्पणवीर वैभव सूर्यवंशी आणि



अभिषेक शर्मा यांनी दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी अवघ्या 4.5 षटकांत 50 धावांची भागीदारी रचली. वैभव 14 धावा करून बाद झाला. यानंतर इशान किशनने 49 धावांचे योगदान दिले तर अभिषेक 43 धावा करून बाद झाला. याशिवाय, तिलक वर्माने 11 चेंडूत नाबाद 24 धावांचे योगदान दिले. कर्णधार श्रेयस अय्यरने 22 चेंडूत 37 धावांची खेळी केली. या जोरावर भारताने 7 बाद 190 धावा केल्या.

टीम इंडियाने विजयासाठी दिलेले 191 धावांचे टार्गेट इंग्लंडने 19 व्या षटकांतच पूर्ण केले. जेकब बेथेलने 46 चेंडूत नाबाद 76 धावांची खेळी करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. त्याच्या खेळीत 5 चौकार, 5 षटकारांचा समावेश होता. याशिवाय, हॅरी ब्रूकने 15 चेंडूत 39 तर टॉम बॅन्टने 32 चेंडूत 39 धावा केल्या. बेथेलला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. भारताच्या अर्शदीप सिंगने 40 धावांत 3 बळी मिळविले.

**संक्षिप्त धावफलक :** भारत 20 षटकांत 7 बाद 190 : अभिषेक शर्मा 24 चेंडूत 43, वैभव सूर्यवंशी 10 चेंडूत 14, इशान किशन 40 चेंडूत 49, श्रेयस अय्यर 22 चेंडूत 37, तिलक वर्मा 11 चेंडूत नाबाद 24, अवांतर 10. सॅम करन 3-33, जोफ्रा आर्चर 1-40, विल जॅक्स 1-22, डॉसन 1-27.

इंग्लंड 19 षटकांत 6 बाद 191 : हॅरी ब्रुक 15 चेंडूत 39, बेथेल 46 चेंडूत नाबाद 76, बॅन्टन 32 चेंडूत 39, आर्चर नाबाद 10, अवांतर 11. अर्शदीप सिंग 3-40, हर्षित राणार 1-30, अक्षर पटेल 1-20, वरुण चक्रवर्ती 1-37.

# इंडिया अ चा श्रीलंकेविरुद्ध ५४१ धावांचा डोंगर

**गॅले/वृत्तसंस्था**

शनिवारी दुसऱ्या अनधिकृत कसोटीत पावसाचा व्यत्यय आलेल्या तिसऱ्या दिवशी, साई सुदर्शनची बहारदार 168 धावांची खेळी आणि मधल्या व तळाच्या फळीतील फलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे इंडिया अ ने 8 बाद 541 धावांची भक्कम मजल मारली. सामन्याचा एक दिवस बाकी असताना इंडिया अ कडे आता 175 धावांची आघाडी आहे. दिवसाची सुरुवात 104 धावांवरुन करणाऱ्या सुदर्शनने आपली खेळी पुढे चालु ठेवली आणि मोठी शतकी खेळी (168 धावा, 267 चेंडू, 22 चौकार) साकारली. तत्पूर्वी, देवदत्त पडिकल त्याच्या आदल्या दिवसाच्या 94 धावांच्या



धावसंख्येवर बाद झाला. देवदत्त पहिल्याच षटकात बाद झाल्यामुळे भारताची धावसंख्या 2 बाद 248 अशी झाली होती. परंतु सुदर्शनला कर्णधार ध्रुव जुरेलने 88 चेंडूत 53 धावा करत चांगली साथ दिली.

सुदर्शन आणि जुरेल यांची जोडी जमण्यापूर्वी भारताला एका चिंतेच्या प्रसंगाला सामोरे जावे लागले. वेगवान गोलंदाज असंका मनोजचा चेंडू हेल्मेटवर आदळल्यामुळे ऋतुराज गायकवाडला 13 धावांवर पॅव्हेलियनमध्ये परत जावे लागले. तरीही या दोन कुशल खेळाडूंनी भारताला त्या कठीण प्रसंगातून सावरले. मात्र गायकवाड रविवारी फलंदाजीसाठी उतरू शकेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

सुदर्शन आणि जुरेल यांनी तिसऱ्या गड्यासाठी 120 धावांची भागीदारी करत यजमान संघाला आणखी यश मिळवण्यापासून रोखले आणि इंडिया अ चे वर्चस्व कायम राखले. सुदर्शनकडे द्विशतक करण्याची संधी होती, परंतु डावखुरा फिरकी गोलंदाज दिलुम सुदिरा याने त्याला पायचीत बाद केले. त्यानंतर जुरेलही जास्त काळ टिकू शकला नाही. यष्टिरक्षक फलंदाज असलेल्या जुरेललाही सुदिराने पायचीत केले. तसेच शेख रशीदने 51 चेंडूत जलद 45 धावा केल्या. पण ऑफ स्पिनर केशरा नुवान्थाच्या गोलंदाजीवर तोही पायचीत झाला. त्यावेळी भारताची धावसंख्या 5 बाद 454 अशी होती आणि ते 84 धावांची आघाडीवर होते. पाहुण्या संघालाही आघाडी आणखी वाढवण्याची गरज होती. चहापानानंतर पावसामुळे खेळ जवळपास तासभर थांबला होता. त्यानंतर सारांश जैन नाबाद 68 आणि आकिब नबी 30 यानी सहाव्या विकेटसाठी 81 धावांची भागिदारी करत संघाला मजबूत स्थितीत नेले. दिवसाच्या खेळाच्या अगदी शेवटी, मनोजने डीपमध्ये झेल घेतल्यामुळे तो पार्ट टाइम फिरकी गोलंदाज सहन अराचिगेचा बळी ठरला. मात्र तोपर्यंत इंडिया अ संघाने चांगली आघाडी घेतली होती.

**संक्षिप्त धावफलक श्रीलंका अ :** सर्वबाद 366 , इंडिया अ 142 षटकांत 8 बाद 541 (साई सुदर्शन 168, देवदत्त पडिकल 94, ध्रुव जुरेल 53, सारांश जैन नाबाद 68, केशरा नुवान्था 4-158, दिलुम सुदिरा 3-101).

# अमेरिका–बोस्निया सामन्यास विक्रमी 'व्ह्यूअर्स'

**न्यूयॉर्क/वृत्तसंस्था**




अमेरिकेत सध्या 'वर्ल्ड कप'चा (विश्वचषकाचा) उत्साह संचारला आहे. 'फॉक्स स्पोर्ट्स'च्या माहितीनुसार, बुधवारी रात्री झालेला अमेरिका आणि बॉस्निया-हर्झगोव्हिना यांच्यातील सामना हा इंग्रजी भाषेतील इतिहासातील सर्वाधिक पाहिला गेलेला सॉकर सामना ठरला; हा सामना 24.4 दशलक्षाहून अधिक प्रेक्षकांनी पाहिला. या सामन्याच्या वेळी सर्वाधिक प्रेक्षकसंख्या 31.8 दशलक्ष इतकी होती.

कॅलिफोर्नियातील सांता क्लारा येथे झालेल्या या सामन्यात अमेरिकेने 2-0 असा विजय मिळवून 'राउंड ऑफ 16' (अंतिम 16 संघांची फेरी) मध्ये प्रवेश केला. 2002 नंतरचा हा त्यांचा 'नॉकआउट' फेरीतील पहिलाच विजय ठरला. या सामन्याने 2015 च्या 'फिफा महिला विश्वचषक' अंतिम सामन्याच्या प्रसारणाचा विक्रम मोडला; त्यावेळी इंग्रजी भाषेतील टीव्हीवर 22.3 दशलक्ष प्रेक्षकांनी सामना पाहिला होता.तुलनेसाठी सांगायचे तर, आतापर्यंतचा सर्वाधिक पाहिला गेलेला 'सुपर बाउल'सामना 2025 मध्ये झाला होता, जेव्हा 'फिलाडेल्फिया ईगल्स' आणि 'कॅन्सस सिटी चीफ्स' यांच्यातील सामना 'फॉक्स', 'फॉक्स डेपोर्टस', 'टेलमुंडो' आणि 'टुबी' या वाहिन्यांवर सरासरी 127.7 दशलक्ष प्रेक्षकांनी पाहिला होता. सामन्याच्या दुसऱ्या सत्रात (क्वार्टरमध्ये) सर्वाधिक सरासरी प्रेक्षकसंख्या 137.7 दशलक्ष इतकी होती. विश्वचषकादरम्यान आतापर्यंत अमेरिकेत सर्वाधिक प्रेक्षकांनी पाहिलेला सामना मेक्सिको विरुद्ध इक्वेडोर हा होता; या सामन्याचे एकूण 29.3 दशलक्ष प्रेक्षक होते.

# शेवटी ३–२ ने मिळविला विजय; मेस्सी, लिसँड्रो मार्टिनेझकडून गोल

**मियामी गार्डन्स, फ्लोरिडा/वृत्तसंस्था**

लायोनेल मेस्सीने आपल्या कपाळावरचा घाम पुसला आणि सुटकेचा निःश्वास टाकला. त्याच्या अर्जेंटिनाच्या सहकाऱ्यांनीही तसेच केले. कारण केप वर्देविरुद्धचा अपेक्षित नव्हता इतका रोमांचक आणि अविस्मरणीय झालेला विश्वचषक सामना संपला होता आणि पराभवाच्या उंबरठ्यावर पोहोचल्यानंतर गतविजेत्यांनी 3-2 असा विजय मिळवला होता.

111 व्या मिनिटाला क्रिस्तियान रोमेरोने हाणलेला 'हेडर' केप वर्देच्या दिनी बोर्जेसला लागून चेंडूने दिशा बदलल्यामुळे अर्जेंटिनाला मिळालेली आघाडी 'स्वयंगोल' म्हणून नोंदवली गेली. मेस्सीने निर्धारित वेळेच्या सुरुवातीलाच गोल केला. हा त्याच्या कारकिर्दीतील 20 वा विश्वचषक गोल आहे, ज्याने त्याचाच विक्रम अधिक भक्कम केला.



त्यानंतर 92 व्या मिनिटाला लिसँड्रो मार्टिनेझने गोल करून अर्जेंटिनाला 2-1 अशी आघाडी मिळवून दिली.

केप वर्देसाठी सिडनी लोपेस काब्राल आणि डेरॉय डुआर्टे यांनी गोल केले. हे दोन्ही गोल बरोबरी साधणारे होते, ज्यामुळे दक्षिण फ्लोरिडातील अर्जेंटिनाचे समर्थक अवाक झाले. काब्रालचा गोल 103 व्या मिनिटाला गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझला चकवून उजव्या पायाने मारलेल्या वळणदार फटक्यावर झाला. हा गोल अत्यंत रोमांचक ठरलेल्या या सामन्याला आणखी अविश्वसनीय वळण देणारा ठरला. यामुळे सामना 2-2 असा बरोबरीत आला आणि पेनल्टी शूटआउटमध्ये मेस्सीचा सामना केप वर्देचा उत्कृष्ट गोलरक्षक वोजिन्याशी होण्याची शक्यता निर्माण झाली.

पण आठ मिनिटांनंतर अर्जेंटिनाने पुन्हा आघाडी घेतली आणि ती टिकवून ठेवत पुढील फेरीत प्रवेश केला. आता मंगळवारी अटलांटा येथे त्यांचा सामना इजिप्तशी होईल. मेस्सीने या सामन्यातून आपल्या खात्यात आणखी एका शानदार गोलची भर घातली. मार्टिनेझने हवेतून दिलेल्या पासवर मेस्सीने अचूक वेळेत धाव घेत केप वर्देच्या बचावपटूंच्या मागे जागा शोधली. त्यानंतर चेंडूला हलकासा स्पर्श करून तो थेट गोलजाळीच्या वरच्या भागात सारला आणि 29 व्या मिनिटाला संघाला 1-0 अशी आघाडी मिळवून दिली.

या स्पर्धेत मेस्सीचे आता सात गोल झाले आहेत. या वर्षीच्या विश्वचषकात सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूला मिळणाऱ्या 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत तो फ्रान्सच्या किलियन एमबाप्पेपेक्षा एका गोलने पुढे आहे. तसेच त्याने आपला विश्वचषकातील विक्रम आणखी सुधारला असून कारकिर्दीतील एकूण गोलांच्या यादीत तो एमबाप्पेपेक्षा दोन गोलांनी पुढे आहे. सलग आठ सामन्यांत गोल करण्याच्या आपल्या विक्रमी मालिकेत त्याने एकूण 12 गोल केले आहेत. सामन्यातील गोल करण्याची पहिली संधीही मेस्सीला मिळाली होती. 15 व्या मिनिटाला त्याने मारलेला फटका गोलपोस्टच्या समोरून वेगाने गेला खरा, पण तो उजव्या खांबाच्या बाहेरून गेला. खाली पाडल्यानंतर तीन मिनिटांनंतर त्याला 25 यार्डांवरून 'फ्री-किक' मिळाली, जी गोलरक्षक वोजिन्याने सहजपणे रोखली. जेव्हा जेव्हा संघाला गरज होती तेव्हा तेव्हा वोजिन्याने अप्रतिम बचाव करून दाखवला.

# भयानक मराठी सिनेमा, एकट्यात पाहण्याची चूक करू नका; बॉलिवूडला मागे टाकत 'इतक्या' कोटींची कमाई



मराठी, हिंदी आणि हॉलिवूडमधील बहुचर्चित चित्रपट प्रदर्शित असतानाही 'घबाडकुंड'ने प्रेक्षकांची पसंती मिळवत बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी केली आहे. रहस्य, थरार आणि भयाचा अनोखा अनुभव देणाऱ्या या चित्रपटाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून अनेक चित्रपटगृहांमध्ये हाऊसफुलचे फलक झळकताना दिसत आहेत. 'राजा शिवाजी', 'तुंबाडची मंजुळा', 'देऊळ बंद', या मराठी चित्रपटांसोबत बॉलिवूडचे 'कॉकटेल', 'में वापस आऊंगा', 'वेलकम टू द जंगल' आणि हॉलिवूडमधील 'द ओडिसी', 'स्पायडर-मॅन' तसेच 'ऑब्सेशन' यांसारख्या मोठ्या चित्रपटांची स्पर्धा असतानाही 'घबाडकुंड'ने आपल्या वेगळ्या आशयाच्या जोरावर प्रेक्षकांची विशेष पसंती मिळवत बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी नोंदवली आहे.

दुसऱ्या आठवड्याच्या अखेरीस चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तब्बल ८.१० कोटींची कमाई करत यशाची नवी उंची गाठली असून, आता तिसऱ्या आठवड्यातही दिमाखदार वाटचाल सुरू ठेवली आहे. मराठी, हिंदी आणि हॉलिवूडमधील मोठ्या चित्रपटांशी स्पर्धा असतानाही 'घबाडकुंड'ने स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं असून, तिसऱ्या आठवड्यातही चित्रपटावरील प्रेक्षकांचे प्रेम कायम असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

चित्रपटातील लेखन, दिग्दर्शन, दमदार कलाकारांचा अभिनय, प्रभावी संवाद, पार्श्वसंगीत, तांत्रिक मांडणी आणि उत्कंठावर्धक सादरीकरण या सर्वच बाबींचे प्रेक्षकांकडून भरभरून कौतुक होत आहे. त्यामुळे 'घबाडकुंड'ची चर्चा सोशल मीडियासह सर्वत्र रंगताना दिसत आहे. पहिल्या आठवड्यापासून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे अनेक चित्रपटगृहांमध्ये शोची संख्या वाढवण्यात आली असून, अनेक ठिकाणी प्रेक्षकांनी आगाऊ बुकिंगलाही मोठा प्रतिसाद दिला आहे. कुटुंबासह, मित्रमंडळींसोबत आणि ग्रुप बुकिंगद्वारे हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक मोठ्या संख्येने चित्रपटगृहांकडे गर्दी करत आहेत. टिकिटिंग प्लॅटफॉर्मवरही 'घबाडकुंड' ला प्रेक्षकांकडून उत्कृष्ट रेटिंग मिळत असून, सकारात्मक 'वर्ड ऑफ माऊथ'मुळे नव्या प्रेक्षकांची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. हा प्रतिसाद केवळ एका चित्रपटाच्या यशापुरता मर्यादित नसून, मराठी चित्रपटांवर प्रेक्षकांचा वाढता विश्वास आणि दर्जेदार आशयाला मिळणारी दाद अधोरेखित करणारा आहे.

'आयकॉन द स्टाईल'चे निर्मिति डॉ. रसिक कदम निर्मित आणि प्रीतम एस. के. पाटील दिग्दर्शित 'घबाडकुंड' हा चित्रपट आजही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरतो आहे. रहस्य आणि थराराचा वेगळा अनुभव घेण्यासाठी प्रेक्षकांनी चित्रपटगृहांकडे पुन्हा एकदा मोर्चा वळवला असून, तिसऱ्या आठवड्यातही 'घबाडकुंड'ची यशस्वी घोडदौड कायम राहणार असल्याचा विश्वास चित्रपटाच्या संपूर्ण टीमने व्यक्त केला आहे.

## पावसातही आमिरच्या घरी लग्नाची तयारी

आमिर खान वयाच्या ६१ व्या वर्षी तिसऱ्यांदा बोहल्यावर चढणार आहे. १५ वर्ष लहान गौरी स्प्रॅटसोबत तो उद्या लग्न करणार आहे. हे लग्न आमिरच्या मुंबईतील राहत्या घरी अगदी साध्या पद्धतीने होणार आहे. दोघं रजिस्टर्ड मॅरेज करणार आहेत. तसंच लग्नाला मोजक्याच लोकांना आमंत्रण देण्यात आलं आहे. नातेवाईक आणि जवळच्या मित्रमंडळींचा यात समावेश आहे. भर पावसात आमिरच्या घरी लग्नाची तयारी सुरु झाली आहे. पाली हिल येथील घराबाहेरील व्हिडीओ आता व्हायरल होतोय.

आमिर खानचं पाली हिल येथील घर सजलं आहे. लाइट्स आणि फुलांची सजावट करण्यात आली आहे. त्याच्या घराबाहेर आलेला टेम्पो व्हिडीओत दिसत आहे. भर पावसातही त्याच्या घरी खुर्च्या आणि इतर सजावटीचं सामान घेऊन लोक आले आहेत. मुंबईत सध्या धो धो पाऊस कोसळत असताना हे लोक रेनकोट घालून आमिरच्या लग्नाची तयारी करत आहेत. आमिरचे नातेवाईकही त्याच्या घरली दाखल झाले



आहेत. सेलिब्रिटी फोटोग्राफर वरिंदर चावला यांच्या इन्स्टाग्राम पेजवर व्हिडीओ अपलोड करण्यात आला आहे. आमिर नुकताच प्रीतम अँड पेड्रो सीरिजच्या स्क्रीनिंगला आला होता. तिथे त्याने सर्वांसमोर लग्नाची घोषणा केली. अगदी साध्या घरगुती पद्धतीने हे लग्न होणार असल्याचं त्याने सांगितलं. तसंच आम्हाला आशीर्वाद द्या अशीही विनंती केली. आमिरची होणारी तिसरी बायको गौरी स्प्रॅट मूळ बंगळुरुची आहे. सध्या ती आमिर खान प्रोडक्शनमध्ये काम करत आहे. तिने लंडनच्या आर्ट्स युनिव्हर्सिटीमधून फॅशन, स्टायलिंग आणइ फोटोग्राफीचं शिक्षण घेतलं आहे. 'बी ब्लंट हेअरड्रेसिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत ती पार्टनर आणि डायरेक्टर पदावर आहे.

## मोठ्या प्रमाणावर चर्चा, पण तरीही...; आलिया–शर्वरीचा 'अल्फा' बॉक्स ऑफिसवर पास की फेल ?

बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट आणि शर्वरी वाघची मुख्य भूमिका असलेला स्पाय ॲक्शन थ्रिलर'अल्फा' हा चित्रपट ३ जुलै रोजी रिलीज झाला आहे. प्रदर्शनाच्या आधीपासूनच या चित्रपटाची भरपूर चर्चा झाली. यश राज फिल्म्स स्पाय युनिव्हर्समधील हा सातवा चित्रपट आहे. यापूर्वी यश राज फिल्म्सची निर्मिती असलेले 'पठाण', 'टायगर 3', 'टायगर जिंदा है', 'एक था टायगर', ' वॉर 2' या चित्रपटांना प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला होता. मात्र, पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाची संथ सुरुवात पाहायला मिळाली. अशातच आता या चित्रपटाचं दुसऱ्या दिवसाचं बॉक्स ऑफिसवर कलेक्शन समोर आलं आहे.



'अल्फा' (Alpha) या चित्रपटात आलिया भट्टसह अभिनेत्री शर्वरी वाघ तसेच अनिल कपूर आणि बॉबी देओल या कलकारांच्या देखील महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. त्याचबरोबर अभिनेता हृतिक रोशनने देखील चित्रपटात पाहुण्या कलाकाराची भूमिका साकारली आहे. तब्बल १३० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेल्या 'अल्फा'ने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी जगभरात १५.८० कोटी रुपये इतका गल्ला जमवला. तर भारतात पहिल्या दिवशी अवघ्या ९ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले.पण दुसऱ्या दिवशी चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ झाल्याचं पाहायला मिळतंय.

रिपोर्टनुसार, प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी'अल्फा'च्या कमाईत २१ टक्यांनी वाढ झाली. चित्रपटाने दुसऱ्या दिवशी बॉक्स ऑफिसवर ११. २५ कोटी रुपये इतका व्यवसाय केला. चित्रपटाने दोन दिवसांत एकूण २०.५० कोटी रुपयांची कमाई केली आहे. मोठ्या प्रमाणावर प्रमोशन करून देखील चित्रपटाला अपेक्षित यश मिळालेलं नाही.

'अल्फा' चित्रपटाचं लेखन उदय चोप्रा यांनी केलं असून निर्मिती आदित्य चोप्रा यांची आहे. 'द रेल्वे मेन' फेम शिव रावैल यांनी दिग्दर्शन केलं आहे.चित्रपटातील ॲक्शन सीक्वेन्स आणि कलाकारांच्या अभिनयाचे कौतुक होत असलं तरी कमकुवत पटकथा आणि कथानकामुळे चित्रपटाला फटका बसल्याचं बोललं जात आहे. आता येत्या काही दिवसांत अल्फा बॉक्स ऑफिसवर काय कमाल करतो, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# "इथे पुरुष कलाकारांच्या तुलनेत महिला कलाकारांना...", क्रिती सनॉनने केली इंडस्ट्रीची पोलखोल, नेमकं काय म्हणाली?

लोकप्रिय बॉलिवूड अभिनेत्री क्रिती सनॉनने आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर इंडस्ट्रीत स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.साजिद नाडियाडवाला यांच्या 'हिरोपंती' या चित्रपटातून अभिनेत्री क्रिती सनॉन हिने इंडस्ट्रीत पाऊल ठेवलं. सध्याच्या घडील बॉलिवूडमधील टॉप अभिनेत्रींमध्ये तिने आपलं स्थान निर्माण केलं आहे. क्रितीने 'बरेली की बर्फी', 'लुका छुपी' आणि 'भेडिया' सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांमध्ये काम केलं आहे. सध्या ही अभिनेत्री 'कॉकटेल-२' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. याचदरम्यान क्रितीने एका मुलाखतीत केलेल्या एका वक्तव्यामुळे ती चर्चेत आली आहे.

दरम्यान, नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत अभिनेत्री क्रिती सनॉनने इंडस्ट्रीत महिलांना येणाऱ्या अडचणी आणि लिंगभेदाबाबत स्पष्टपणे आपलं मत मांडलं आहे. तिच्या या वक्तव्याने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.लिली सिंग यांना दिलेल्या एका मुलाखतीत कृतीने इंडस्ट्रीमध्ये काम करताना येणाऱ्या संघर्षावर भाष्य केलं.

अभिनेत्रीच्या मते, चित्रपटसृष्टीत आजही महिला कलाकारांना पुरुष कलाकारांच्या तुलनेत वेगळ्या नजरेने पाहिलं जातं.करिअरच्या सुरुवातीच्या काळात महिलांसाठी संधी आजच्या तुलनेत खूपच कमी होत्या, असं तिने या मुलाखतीत सांगितलं. ती म्हणाली, "जेव्हा एखादी महिला कलाकार चित्रपटातील तिची भूमिका किंवा सीन्सबाबत दिग्दर्शक किंवा निर्मात्यांना प्रश्न विचारते.तर तिला 'जास्त बोलणारी' किंवा 'खूप प्रश्न विचारणारी' असा शिक्का लावला जातो. पण, जर एखादा पुरुष कलाकार असे प्रश्न विचारला तर त्याला कामाबाबत जागरूक किंवा व्यावसायिक समजलं जातं. माझ्यासोबतही असं घडलं आहे."

क्रिती पुढे म्हणाली, "कधीकधी या छोट्या छोट्या गोष्टी असतात, जसे की पुरुष कलाकाराला कोणती व्हॅनिटी किंवा खोली दिली आणि मला कोणती दिली. म्हणजे, मला काही फरक पडत नाही; मला वेगळी खोली किंवा व्हॅनिटी मिळाली नाही तरी मला कमीपणा वाटत नाही. अगदी काहींची अशीही सवय असते की सेटवर ते महिला कलाकारांना आधी बोलावतात. पुरुष कलाकारांच्या तुलनेत महिला कलाकारांना गृहीत धरलं जातं." कृती सेननच्या या वक्तव्यामुळे बॉलिवूडमधील लिंगभेद, महिलांना मिळणाऱ्या संधी आणि समान वागणुकीबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, कृती सेननच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर अलिकडेच ती 'कॉकटेल २' या चित्रपटात झळकली. होमी अदजानिया दिग्दर्शित या चित्रपटात शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना यांच्या देखील प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑ फि स व र त्याने जगभरात सुमारे १३७ कोटी रुपयांची कमाई केली.



# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

## प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी, सहकार विभाग आणि बँकांचा समन्वय महत्त्वाचा

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृषी विभाग, सहकार विभाग आणि बँकिंग यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत. पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ पारदर्शक, सुलभ आणि वेळेत मिळावा, हा या समन्वित प्रयत्नांचा मुख्य उद्देश आहे. योजनेबाबत मार्गदर्शन, आवश्यक कागदपत्रांची माहिती तसेच शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी कृषी विभाग महत्त्वाची भूमिका बजावतो. विविध स्तरांवर जनजागृती करून शेतकऱ्यांना योजनेची अचूक माहिती उपलब्ध करून दिली जाते. सहकार विभागामार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, विविध सहकारी संस्था आणि संबंधित यंत्रणांमध्ये आवश्यक समन्वय साधला जातो. योजनेच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय प्रक्रिया सुरळीत आणि परिणामकारक होण्यासाठी हा विभाग महत्त्वाचा दुवा ठरतो. बँकांकडून कर्ज खात्यांची पडताळणी, कर्जाशी संबंधित नोंदींची शहानिशा तसेच आवश्यक आर्थिक माहितीची पूर्तता केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले बँक खाते कार्यरत ठेवणे, केवायसी पूर्ण करणे, आधार क्रमांक संलग्न करणे आणि मोबाईल क्रमांक अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. योजनेसंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास संबंधित कृषी कार्यालय, सहकार विभाग किंवा ज्या बँकेत कर्ज खाते आहे त्या शाखेशी संपर्क साधावा. अप्रमाणित माहिती किंवा अफवांवर विश्वास न ठेवता शासनाकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही पात्र शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याबरोबरच शेती क्षेत्र अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्य शासनाचे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन, प्रशासन, बँका आणि शेतकरी यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असून, सर्वांनी सक्रिय सहकार्य केल्यास योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचू शकेल.

# तेलबिया व कडधान्य प्रक्रिया उद्योगांना अनुदान ऑफलाइन अर्ज आमंत्रित

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील सोयाबीन, तीळ व इतर तेलबिया तसेच तूर, मूग, उडीद, हरभरा आदी कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करून स्थानिक स्तरावर प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (-) आणि कडधान्य आत्मनिर्भरता अभियान २०२६-२७ अंतर्गत प्रक्रिया युनिट्स, मिनी ऑईल मिल, गोदाम बांधकाम व कडधान्य प्रक्रिया-पॅकेजिंग युनिट्स उभारण्यासाठी लाखो रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून पात्र लाभार्थ्यांकडून ऑफलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. योजनेअंतर्गत २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी सुमारे २८.८० लाख रुपयांचा प्रकल्प खर्च निश्चित करण्यात आला आहे. यासाठी पात्र लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपये इतके अनुदान दिले जाणार आहे. शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ/एफपीसी), सहकारी संस्था, सार्वजनिक व खासगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था या योजनेसाठी पात्र असून मूल्यसाखळी भागीदारांना प्राधान्य दिले जाणार आहे. लाभार्थ्यांची निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. तेलबिया प्रक्रिया उद्योगांसाठीही स्वतंत्र अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये अनुदान मिळणार आहे. तसेच फिल्टर प्रेससह मिनी ऑईल मिलसाठी कमाल ४ लाख रुपये, तर फिल्टर प्रेसशिवाय मिनी ऑईल मिलसाठी कमाल ३ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. या अनुदानामध्ये केवळ यंत्रसामग्री व उपकरणांचा खर्च ग्राह्य धरला जाणार असून जमीन किंवा इमारत बांधकामाचा खर्च ग्राह्य धरण्यात येणार नाही. कडधान्यांवर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून ब्रँडिंगला चालना देण्यासाठी कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट्ससाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेत प्रक्रिया युनिटबरोबर साठवणूक सुविधेलाही अनुदान उपलब्ध असले तरी इमारत किंवा गोदाम बांधकामासाठीचे अनुदान एकूण पात्र अनुदानाच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही. एफपीओ, क्लस्टर स्तरावरील महासंघ, प्राथमिक कृषी पतसंस्था आणि २१ वर्षांवरील वैयक्तिक उद्योजक या योजनेसाठी पात्र असून युनिटची किमान क्षमता ३०० किलो प्रति तास असणे आवश्यक आहे. दोन्ही योजनांमध्ये क्रेडिट लिंक बॅकएंडेड सबसिडी पद्धतीने अनुदान दिले जाणार असल्याने लाभार्थ्यांनी बँक कर्ज घेणे बंधनकारक आहे. तसेच प्रकल्प खर्चातील किमान १५ टक्के हिस्सा स्वतः उभारावा लागणार आहे. काम सुरू होण्यापूर्वी व पूर्ण झाल्यानंतर कृषी मॅपर ॲपद्वारे जिओ-टॅगिंग करणे आवश्यक असून योजनेच्या माहितीचा फलक लावणे व ठरावीक कालावधीपर्यंत प्रकल्पाची देखभाल करणेही बंधनकारक आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील ऑफलाइन अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रे व जीएसटी नोंदणीकृत पुरवठादारांचे अधिकृत दरपत्रक जोडून सादर करावेत.

# सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज मागविले

**जनसंचलन-बुलढाणा**

खरीप हंगाम २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. राज्य शासनाच्या ३ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यात ही योजना (८०:११०) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी राबविण्यात येत असून, खरीप २०२६ व रब्बी २०२६-२७ हंगामासाठी विमा कंपनीची एका वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणे, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे, संकटाच्या काळात आर्थिक स्थैर्य कायम ठेवणे तसेच कृषी क्षेत्रातील पतपुरवठा व अन्नसुरक्षा मजबूत करणे हा आहे. खरीप हंगाम २०२६ साठी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांची विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, कंपनीचा टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांक १४४४७ आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी असणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच डिजिटल क्रॉप सर्व्हे ( ) अंतर्गत पीक नोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे. विमा अर्जासाठी किमान ०.१० हेक्टर क्षेत्राची अट लागू असून, बोगस किंवा फसवणुकीच्या उद्देशाने विमा घेतल्याचे आढळल्यास संबंधित अर्जदारास पीक विमा योजना तसेच कृषी विभागाच्या विविध डीबीटी योजनांचा लाभ पाच वर्षांसाठी बंद करण्यात येणार आहे. ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी खातेदार, कुळाने किंवा नोंदणीकृत भाडेपट्टी करारावर शेती करणारे शेतकरी योजनेत सहभागी होऊ शकतात. मात्र भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकरार पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. योजनेअंतर्गत खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांचा विमा हप्ता विमा रकमेच्या केवळ २ टक्के, रब्बीसाठी १.५ टक्के आणि नगदी पिकांसाठी ५ टक्के इतका निश्चित करण्यात आला आहे. सर्व अधिसूचित पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के ठेवण्यात आला असून, उंबरठा उत्पादन मागील सात वर्षांतील सर्वोच्च उत्पादनाच्या पाच वर्षांच्या सरासरीच्या आधारे निश्चित करण्यात येणार आहे. भात, सोयाबीन, कापूस आणि गहू या पिकांसाठी पीक कापणी प्रयोगातून मिळालेल्या उत्पादनाला ५० टक्के आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे मिळालेल्या उत्पादनाला ५० टक्के भारांकन देऊन सरासरी उत्पादकता निश्चित केली जाणार आहे. पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कारणांमुळे उत्पादनात घट झाल्यास नियमानुसार नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी अर्ज भरण्यासाठी केवळ विमा हप्ता भरावा. सीएससी केंद्रधारकांना केंद्र शासनाने निश्चित केलेले मानधन विमा कंपनीमार्फत दिले जात असल्याने विमा हप्त्याव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क देऊ नये, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी ३१ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करू शकतात. प्रति हेक्टर शेतकरी हिस्सा (विमा हप्ता) सोयाबीनसाठी १ हजार २५० रुपये, कपाशी १ हजार ३०० रुपये, तूर ९४० रुपये, मूग ७५ रुपये, उडीद ६७.५० रुपये, मका १०० रुपये याप्रमाणे आहे. कृषी विभागाने सर्व पात्र शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज करून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.



# मोबाईल हरवला... अन् थेट ५ शहरात पोहोचला!

## बुलढाणा पोलिसांच्या सीक्रेट ऑपरेशनने उघड केला थरार; ५० मोबाईल अखेर मूळ मालकांच्या हाती!

जनसंचलन बुलढाणा

मोबाईल हरवला म्हणजे तो कायमचाच गेला, अशी अनेकांची समजूत असते. मात्र बुलढाणा शहर पोलिसांनी ही समजूत खोटी ठरवत नागरिकांचा विश्वास आणखी दृढ केला आहे. अवघ्या दोन महिन्यांत तब्बल ५० हरवलेले मोबाईल शोधून त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात देत बुलढाणा शहर पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या सर्व मोबाईलची एकूण किंमत सुमारे साडेसात लाख रुपये असल्याची माहिती समोर आली आहे. बुलढाणा शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीतून गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक संग्राम पाटील यांच्या नेतृत्वात विशेष पथकाची स्थापना करण्यात आली.



या पथकाने केंद्र सरकारच्या पोर्टलसह अत्याधुनिक तांत्रिक प्रणालीचा वापर करून हरवलेल्या मोबाईलचा मागोवा घेतला. तपासादरम्यान हे मोबाईल मुंबई, पुणे, संभाजीनगर, अमरावती आणि जळगाव या विविध शहरांमध्ये वापरले जात असल्याचे उघड झाले. स्वस्त दरात मिळत असल्याने अनेकांनी हे मोबाईल अनोळखी व्यक्तींकडून विकत घेतल्याचेही समोर आले. पोलिसांनी संबंधितांकडून सर्व मोबाईल जप्त करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत ते त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन केले. महागडे मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला असून बुलढाणा शहर पोलिसांच्या तांत्रिक कौशल्याचे आणि तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. हरवलेला मोबाईल शोधणे अशक्य नाही, योग्य वेळी तक्रार आणि पोर्टलवर नोंदणी केल्यास तो परत मिळू शकतो, असा विश्वास या कारवाईमुळे नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

# पुनरीक्षण मोहिमेला वेग; पण मॅपिंगमध्येच अडकली नागरिकांची डोकेदुखी!

जनसंचलन-बुलढाणा

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बुलढाणा जिल्ह्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहीम वेगाने सुरू आहे. जिल्हाभर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणजेच बीएलओ घरोघरी जाऊन मतदारांची माहिती पडताळत आहेत. गणना प्रपत्र भरून घेणे, पात्र मतदारांची माहिती नोंदविणे, मतदार यादी अचूक व अद्ययावत करणे, या उद्देशाने प्रशासन संपूर्ण यंत्रणा कामाला लावल्याचा दावा करत आहे. मात्र, प्रत्यक्षात नागरिकांना मॅपिंग प्रक्रियेत गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र समोर येत आहे. जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक आणि बीएलओ यांच्या माध्यमातून ही मोहीम राबविली जात आहे. प्रशासन नागरिकांना अचूक माहिती देण्याचे आवाहन करत असताना, दुसरीकडे २००२ च्या मतदार यादीच्या आधारे होणाऱ्या मॅपिंगमध्ये मोठा गोंधळ निर्माण होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २००२ च्या यादीत आई आणि वडील दोघांची नावे असतील, तर केवळ चार अपत्यांचेच मॅपिंग होत आहे. पाचवे अपत्य मॅपिंग करताना ङ्कडिफॉल्टरफ दाखवले जात असल्याने संबंधित कुटुंबांची धावपळ सुरू झाली आहे. याहून गंभीर बाब म्हणजे, आई किंवा वडील यापैकी एकाच व्यक्तीचे नाव २००२ च्या यादीत असेल, तर फक्त दोन अपत्यांचे मॅपिंग होत असून तिसरे अपत्यही डिफॉल्टर दाखवले जात आहे. मतदार यादी अचूक करण्याच्या नावाखाली सुरू असलेल्या या प्रक्रियेत अशा तांत्रिक अडचणी राहिल्यास पात्र मतदारच अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने केवळ आवाहनांवर न थांबता मॅपिंगमधील त्रुटी तातडीने दूर कराव्यात, अशी नागरिकांची मागणी आहे. लोकशाही मजबूत करायची असेल, तर पात्र मतदाराला ङ्कडिफॉल्टरफ ठरविण्याऐवजी त्याचा अधिकार सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे.

# नियोजनशून्य नगरपरिषद; जनतेच्या पैशांची उधळपट्टी? अर्ध्या किलोमीटरमध्ये तब्बल २२ स्पीड ब्रेकर, संतनगरीतील कारभारावर संताप!

जनसंचलन-शेगाव

संतनगरीतील नगरपरिषदेच्या नियोजनशून्य कारभारावर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तब्बल दोन हजार कोटींच्या विकास आराखड्याची चर्चा होत असताना प्रत्यक्षात अर्ध्या किलोमीटरपेक्षाही कमी अंतरावर तब्बल २२ स्पीड ब्रेकर उभारण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुरक्षिततेच्या नावाखाली करण्यात आलेल्या या कामामुळे वाहनचालकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून, वाहनांचे नुकसान आणि इंधनाची अतिरिक्त नासाडी होत असल्याची तक्रार नागरिक करत आहेत. वाहतूक नियंत्रणासाठी जड वाहनांना बंदी, वन-वे मार्ग किंवा इतर प्रभावी उपाययोजना करता आल्या असत्या. मात्र त्याऐवजी नव्याने तयार झालेल्या रस्त्यांवर वारंवार स्पीड ब्रेकर उभारून रस्त्यांचेच नुकसान करण्यात आल्याचा आरोप होत आहे. नगराध्यक्ष, नगरसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांनी नियोजनाऐवजी केवळ



निधी खर्च करण्यावर भर दिल्याची चर्चा रंगली आहे. जनतेच्या कराच्या पैशांचा असा वापर म्हणजे विकास की उधळपट्टी, असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा सिटी न्यूज ने प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला असून, या नियोजनशून्य कारभाराबाबत संबंधित प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# डोणगावचा दारू कॉरिडॉर कोणाच्या आशीर्वादाने?

जनसंचलन-डोणगाव

परिसरात अवैध देशी दारू वाहतुकीने पुन्हा डोके वर काढल्याचे चित्र समोर येत आहे. दररोज सकाळच्या सुमारास विनानंबर प्लेट असलेल्या दुचाकींवरून मोठ्या प्रमाणात देशी दारूची वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत असून, त्यामुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. माहितीनुसार, डोणगाव येथून आरेगाव, लेहणी, करंजी, मादणी आणि वडजी या ग्रामीण भागात रोज सकाळी सुमारे ९.२० वाजण्याच्या सुमारास दारूचे बॉक्स पोहोचवले जात आहेत. विशेष म्हणजे, वाहतुकीसाठी विनानंबर दुचाकींचा वापर होत असल्याने या प्रकारामागे नियोजनबद्ध साखळी कार्यरत असल्याची चर्चा आहे. या अवैध वाहतुकीमुळे ग्रामीण भागातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. भरदिवसा मुख्य मार्गांवरून सुरू असलेली ही हालचाल नेमकी कोणाच्या



संरक्षणाखाली सुरू आहे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून अवैध दारू व्यवसायाशी संबंधित व्यक्ती, तस्कर आणि पुरवठा साखळीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. संबंधित यंत्रणांनी या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देत वस्तुस्थितीची पडताळणी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८